dev-officer@grampanchayatmaan.org

श्री. शशिकांत प्रकाश धुमाळ
उपसरपंच
dhumalshashikant24@gmail.com

सौ. अर्चना सचिन आढाव
सरपंच
archana.aadhav2021@gmail.com

91/

(ग्रामपंचायत माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०५७ — आ.क्र. ५५, १८/०३/२२)

प्रति,

मा.जिल्हाधिकारी सो,
जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे
..........व्दारा
मा.गटविकास अधिकारी सो,वर्ग–१
पंचायत समिती मुळशी,पौड

PA 16/3/22

विषय:–ग्रा.पं.माण ला घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी जागा मिळणे बाबत.

संदर्भ:–१ ग्रा.पं.माण विशेष सभा दि.२५/०१/२०२२ ठराव क्र.३७९/३ अन्वये
२.ग्रा.पं.माण ग्रामसभा दि.२६/०१/२०२२ ठराव क्र.७६ अन्वये

4-20

महोदय,

वरील संदर्भिय विषयांस अनुसरून आपणांस विनंती पूर्वक सविनय सादर करण्यात येतो की, मौजे माण हे जागतिक नकाशावरील आय.टी.पार्क मधील गाव आहे त्यामुळे गावची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे व ग्रा.पं.माण हद्दित अनेक मोठ मोठे गृहप्रकल्प उभे राहत आहेत नागरी वसाहती मधुन तसेच गावाच्या परीसरातुन मोठया प्रमाणात दैनंदिन घनकचरा निर्माण होत आहे.

16/3/22

(शिक्का: कार्यालय मुळशी (पौड) ... आवक/जावक)

ग्रा.पं.ने मा.मुकाअ सो,जि.प.पुणे यांची मान्यता घेवुन ग्रा.पं.ची घनकचरा प्रकल्पासाठी जागा नसल्याने खाजगी ठेकेदारा मार्फत माण हद्दितील स.नं.३००/१ मध्ये घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प सुरू केलेला होता.परंतु स्थानिक नागरीकांनी प्रकल्पाकडे जाणारा रस्ता बंद केल्यामुळे सदर प्रकल्प बंद पडलेला आहे.त्यामुळे तेथील प्रकल्पात कच–यावर प्रक्रिया करता येत नाही.त्यामुळे गावात दैनंदिन निर्माण होणा–या कच–याची विल्हेवाट लावणेस अडचण निर्माण झाली आहे.[illegible] नाईलाजास्तव अपरिहार्य कारणामुळे ग्रा.पं.हद्दितील डोंगराच्या कडेला मोकळया जागेत सध्या [illegible] [illegible] टाकत आहे.सदर कच–याच्या दुर्गंधीमुळे व त्रासामुळे आजु बाजुच्या परीसरातील नागरीक [illegible] या बाबत वरिष्ठ कार्यालयाकडे तक्रारी करीत आहेत तसेच या बाबत हरीद लवादा कडे [illegible] [illegible] [illegible] आलेली आहे.

collector & BDO 16/3 [illegible]

[illegible] माण घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविणे बाबत प्रयत्नशील असुन जागे अभावी [illegible] [illegible] घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प ग्रा.पं.माण उभारू शकली नाही.त्यामुळे

(30)

(F)

संदर्भिय ग्रा.पं.मासिक सभा व ग्रामसभा ठरावान्वये माण हद्दितील स.नं.२१० व २६२ मधील १ हेक्टर जागा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी मागणी करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.त्यानुसार जागा मागणी प्रस्ताव सोबत जोडुन आपणाकडे विनंतीपूर्वक जागा मिळणे कामी सादर करण्यात येत आहे.तेंव्हा कृपया ग्रा.पं.माण ला घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी जागा मिळावी ही नम्र विनंती.

कळावे,

आपले विश्वासू

ग्रामविकास अधिकारी सरपंच

ग्रामपंचायत माण

ता.मुळशी, जि.पुणे

सोबत:—जागा मागणी प्रस्ताव ५१.पृ.१ ते १४

16/3/22

प्रत:—१ मुख्य कार्यकारी अधिकारी सो,

पुणे जिल्हा परीषद,पुणे

यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर

२ मा.तहसिलदार सो,

तहसिल कार्यालय मुळशी,पौड

यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर

(२)मा.गटविकास अधिकारी सो,वर्ग—१

पंचायत समिती मुळशी,पौड

यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर

(Annexure-G) अ.क्र. ६

31

# कार्यारंभ आदेश

## ग्रामपंचायत माण, ता.मुळशी, जि.पुणे

करारनामा क्रमांक बी.१/ /सन २०२०-२१

ग्रामपंचायत माण,
ता.मुळशी, जि.पुणे
जा.क्र.T2-१९/२०२१
दि.२५/०३/२०२१

प्रति,
**मे.अभय बायो सीएनजी प्रा.लि.पुणे,**
१०३, बहिरटवाडी, सेनापती बापट रोड, जि.पुणे-१६.

**कामाचे नाव** :- **मौजे माण येथील १५ टन ओला व सुका कचरा विलगीकरण करणे व त्याची विल्हेवाट लावणे.**

**संदर्भ** :- **ई-निविदा अंतर्गत बी.१ निविदा नोटीस क्र.-१८/ २०२०-२१.**

**अंदाजपत्रकीय रक्कम :- १,२६,३०,६००/- (अक्षरी रू.एक कोटी सव्वीस लाख तीस हजार सहाशे फ़क्त)**

वरील संदर्भिय पत्राप्रमाणे जाहीर निविदानुसार करारनाम्याची पूर्तता करून दिलेली असुन या आदेशान्वये आपणांस कळविण्यात येते की, सदरचे काम आपण निविदेतील अटी व शर्तीस अधिन राहुन ग्रामपंचायत माण यांचे सुचनेप्रमाणे व मा.उपअभियंता सो।,ग्रा.पा.पु.उपविभाग,ता.मुळशी यांचे मार्गदर्शनाखाली **दिनांक-०१/५/२०२१** पासुन सुरू करावे. सदरचे काम **निविदा दरापेक्षा +१% जादा दराने** मंजुर केलेले असुन त्यानुसार कामाची एकुण **किंमत-१,३८,९३,६६०/- (अक्षरी रू.एक कोटी अडोतीस लाख त्र्यानव हजार सहाशे साठ फ़क्त)** सद्या जीएसटी नियमानुसार सदर कामास जीएसटीची रक्कम देय नाही त्यामुळे सदर कामाबाबत पुढील आदेश येईपर्यंत जीएसटीची रक्कम अदा करण्यात येणार नाही.

सदरच्या काम करणेचा **कालावधी ३६५ दिवस** आहे. त्यानुसार काम करण्याची अंतिम तारीख **दि.३१/४ /२०२२** आहे. करारनाम्यामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार काम करणे आपणावर बंधनकारक राहील. संबंधित कामाबाबत ग्रामपंचायत माण यांचेकडून आपणास वेळोवेळी मिळणा-या सुचना आपणांवर बंधनकारक राहतील.

**<u>अटी व शर्ती खालीलप्रमाणे</u> –**

१. ग्रामपंचायत माण कार्यक्षेत्रातील गाव विभागातील प्रत्येक आस्थापनेवर निर्माण होणाऱ्या दैनंदिन घनकचऱ्याचे ग्रा.पं.ने ठरवुन दिलेल्या निकषानुसार ओला व सुका कचरा याचे प्लास्टिक, रबर कापड ,चप्पल-बूट, धातू इ. प्रकारात विलगीकरण करणे व पुनर्चक्रण याकरिता पाठविण्याचे प्रतिमहा भाडे देणे व त्या अनुषंगाने येणारी इतर कामे करणे. सदर कामाकरिता ग्रा.पं.कडुन कोणत्याही प्रकारची जागा उपलब्ध करून देणार नाही.

२. सदर प्रकल्प दैनंदिन कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असणारा ओला व सुका कचरा, ग्रामपंचायतीने वर्गीकरण करून द्यावयाचा आहे. प्रकल्प धारक/ ठेकेदार हा प्रकल्पांमध्ये कचरा घेण्यास तयार असताना ग्रामपंचायतीने काही कारणास्तव कचरा न दिल्यास त्यास प्रकल्प धारक जबाबदार राहणार नाही व सदर दिवस हा कामाचे दिवसामध्ये धरण्यात येईल.

३. ग्रामपंचायत माणच्या कार्यक्षेत्रामधील गावातील दैनंदिन निर्माण होणारा ओला कचरा शात्रोक्त पद्धतीने (विन्ड्रो कम्पोस्टिंग पद्धतीने) जिरवून त्याचे विहित मानांकनाप्रमाणे खत तयार करणे व त्या अनुषंगाने येणारी इतर कामे करणे, तसेच खताच्या विक्रीची पूर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील.

४. ग्रामपंचायत माण कार्यक्षेत्रामधील दैनंदिन निर्माण होणाऱ्या सुक्या कचऱ्याचे प्लास्टिक,काच, रबर, कापड ,चप्पल- बूट ,धातू इ. प्रकारात विलगीकरण करणे व पुनर्चक्रीकरना करिता पाठवणे व त्या अनुषंगाने येणारी इतर कामे करणे, तसेच यांच्या विक्रीची पूर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील.

५. दैनंदिन निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर त्याच दिवशी पूर्ण प्रक्रिया करणे.व निर्माण झालेल्या खताची चाचणी ६महिन्यातून एकदा करणे बंधनकारक राहील.

६. कामाच्या वेळेत कचरा प्रकल्पावरील नियुक्त कर्मचाऱ्यांनी धूम्रपान व मद्यपान केल्यास संबंधित ठेकेदारांवर व सदर कर्मचाऱ्यावर ग्रामपंचायत कडून कारवाई करण्यात येईल.

७. दैनंदिन निर्माण होणाऱ्या कंपोस्ट खत तयार करणेकरीता व घनकचरा व्यवस्थापनासाठी साठवणुकी करीता आवश्यक जागा, आवश्यक मशिनरी, शेड, प्लॅटफोर्म ठेकेदाराने उपलब्ध करून देणे.

८. प्रकल्पामधून निर्माण होणारे खत चाळवून झाल्यानंतर ठेकेदाराने सदरचे खत घेऊन जाणे. खताच्या विक्रीची पूर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील.

Abhay Bio CNG Pvt. Ltd.

32

९. ग्रामपंचायत माण यांनी दिलेल्या ठेक्याचे, कार्यक्षेत्रामध्ये निवेदन देत दर्शविलेल्या कामाकरिता वेळोवेळी पर्यवेक्षण करणे व या कामाच्या नोंदी ठेवणे ही जबाबदारी ठेकेदाराची राहील. मजुरांकडून वेळापत्रकानुसार काम करून घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१०. कामगारांना लागणारे मास्क (4 नग), रेनकोट(1नग), गमबुट(1नग) व हातमोजे (2नग) वर्षाला आवश्यकतेनुसार ठेकेदाराने पुरवायचे आहेत व ते न पुरविल्यास ग्रामपंचायत पुरवील व त्याची रक्कम ठेकेदाराच्या बिलातून वसूल करण्यात येईल.

११. काम करताना मजूर अथवा साधनांपासून कुठल्याही नागरीकाला त्रास होता कामा नये व पर्यावरण बिघडेल अशी कोणतीही कृती करता कामा नये.

१२. निविदाकाराचे काम असमाधानकारक असल्यास एक महिन्याची पुर्वसूचना देऊन निविदा रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायतिने राखून ठेवलेला आहे सदर ठेका पद्धतीचा कालावधी एक वर्ष आहे काम समाधानकारक वाटल्यास अतिरिक्त मुदतवाढ देणेबाबत वरिष्ठ कार्यालयाच्या मार्गदर्शनानुसार मुदतवाढ देण्यात येईल.

१३. काही कारणास्तव ठेकेदारास संस्थेला काम करण्याची इच्छा नसल्यास ठेकेदाराने किमान एक महिने अगोदर ग्रामपंचायत माणला कळविणे बंधनकारक राहील व त्यामुळे होणारे नुकसान भरपाई ठेकेदार यांचेवर बंधनकारक राहील.

१४. प्रकल्पाच्या ठिकाणी ठेकेदाराच्या कामगारांमध्ये काही वाद उद्भवल्यास त्याची सर्व जबाबदारी ठेकेदारावर राहील .

१५. मा.सरपंच, ग्रामविकास अधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या संबंधित अधिकारी यांच्या सूचनांचे पालन करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

१६. दंगल संप किंवा आपत्कालीन परिस्थितीमध्ये सुद्धा ठेकेदाराच्या कामाची प्रक्रिया चालू राहील परंतु अशा कालावधीमध्ये जबाबदारी पार पाडताना नुकसान झाल्यास झालेल्या नुकसानाची भरपाई मागण्याचा हक्क ठेकेदारास राहील.

१७. करारनाम्यातील कोणत्याही अटी व शर्तींचा ठेकेदाराने भंग केल्यास निवेदन बयाणा रक्कम अनामत रक्कम जप्त करून पूर्व नोटीस देऊन निविदा रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायत माण यांच्याकडे राहील .

१८. कंत्राटदाराने त्याच्याकडे सर्व कामगारांना सामूहिक कामगार विमा उतरविणे ठेकेदारावर बंधनकारक राहील. ठेकेदाराने आपल्या कामगार वर्गाचे ओळखपत्र फोटोग्राफ सहित तयार करून घेणे जरुरीचे आहे.

१९. निविदेसंदर्भात काही वाद झाल्यास ग्रामपंचायत माण सर्वसाधारण सभेचा निर्णय अंतिम राहील.

२०. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर सात दिवसापेक्षा जास्त दिवस ग्रामपंचायत माण वरील कोणत्याही कारणास्तव कचरा देण्यास असमर्थ ठरली आणि ठेकेदारास प्रकल्प पुन्हा कार्यान्वित करण्याची गरज भासली तर होणारा खर्च देण्याची पूर्ण जबाबदारी ग्रामपंचायत माण ची राहील.

२१. कोणत्याही ऑर्डर वर अधिकाऱ्याची सही नसल्यास अगर तोंडी ऑर्डर दिल्यास ठेकेदार यांनी काम करावयाचे नाही आणि जर ठेकेदाराने याप्रमाणे काम करून दिले व त्यामध्ये गफलत झाली तर सदर कामाची रक्कम ठेकेदार यास ग्रामपंचायतीकडून मागता येणार नाही.वर नमूद केलेल्या तरतुदीप्रमाणे ऑर्डर मिळाल्यानंतर या मुदतीत ग्रामपंचायतीला काम करून देण्याबाबत ऑर्डर दिली असेल त्या मुदतीत ठेकेदार यांनी जितक्या कामासाठी ऑर्डर दिली असेल तितके काम घेऊन कार्यालयाचे दिवशी व वेळी ग्रामपंचायतेतील कार्यालयात अगर ऑर्डर मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी हजर राहावे. ठेकेदाराने केलेले काम बरोबर आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी त्याचप्रमाणे दिलेल्या कामाची खात्री करून ते ताब्यात घेण्यासाठी ग्रामपंचायतीने सांगितलेल्या इसमास काम दाखवून त्या कामाची खात्री करून द्यावी.

२२. निविदामधील व जि.प.च्या तांत्रिक मान्यता आदेशातील अटी व शर्ती व त्यास अनुसरून सदर प्रकल्पाबाबत ग्रामपंचायत व ठेकेदार यांच्यामध्ये झालेला पत्रव्यवहार हा या करारनाम्याचा अविभाज्य घटक राहील.

२३. सदरचे काम मंजुर निविदा कालावधीमध्ये दररोज करणे बंधनकारक राहील. कचरा गोळा करणे तसेच विल्हेवाट लावण्याचे काम सार्वजनिक तसेच इतर सुट्यांचे दिवशी ठेकेदारास काम बंद ठेवता येणार नाही.काही अपरिहार्य कारणास्तव कचरा प्रक्रिया प्रकल्प बंद ठेवायचा असल्यास ग्रा.पं.कार्यालयास अगोदर लेखी स्वरूपात पुर्व कल्पना देणे बंधनकारक राहील व त्यादिवशी पर्यायी व्यवस्था करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

२४. आम्ही नेमलेले मजुर/कर्मचा-यांना लागणारी सुरक्षा विषयक साधने उदा.हॅण्ड ग्लोव्हज,युनिफ़ॉर्म ई, ठेकेदार खर्चाने पुरविणार आहेत. तसेच कामावर असणा-या आमचे मजुर कर्मचारी यांस कोणत्याही प्रकारची इजा,दुखापत,अपघात झाल्यास त्यास ठेकेदार जबाबदार आहे त्याचा सर्व वैध्यकीय खर्च करणेची जबाबदारी ठेकेदार यांची राहील. याबाबत ग्रा.प.ला जबाबदार धरले जाणार नाही व कोणताही मोबदला ग्रा.पं.देणार नाही याची आम्हा(ठेकेदार) यांना स्पष्ट कल्पना दिली आहे व ती आम्हाला मान्य आहे.

२५. किमान वेतन कायदा १९४८, व वेतन प्रदान १९३६ बालकामगार (प्रतिबंध व निर्मुलन अधिनियम १९८६ व अन्य कामगार कायद्याचे कुठल्याही प्रकाराचे उल्लंघन होणार नाही त्या कायद्यांचे पालन करण्याची जबाबदारी ही कंत्राटदार यांची राहील.त्यासंदर्भातील कामगारांचा वीमा काढणेची

Abhinav Bio CNG Pvt. Ltd.

जबाबदारी ठेकेदार यांचीच राहील.कामगार कायदा १९६०नुसार कामगारांना आठवडा सुट्टी देणे व आठवडा सुट्टीचे दिवशी पर्यायी मजुर उपलब्ध करून देणेची जबाबदारी ही ठेकेदारावर राहील.

२६. प्रतिदिन संकलन होणारा कचरा महाराष्ट्र शासन प्रदुषण मंडळाच्या नियमानुसार वर्गीकरण करून विल्हेवाट लावणे बंधनकारक राहील.

२७. सदर कामाच्या स्थिती/दर्जानुसार उपविभागामार्फत कामाचे मुल्यांकन करण्यात येईल प्राप्त मुल्यांकनानुसार शासन नियमानुसार कपाती करून देयक अदा करण्यात येईल.

२८. घनकचरा प्रकल्पाकरिता पुरविण्यात येणा-या सर्व मशिनरी व साहित्याचा विमा उतरविण्याची जबाबदारी ठेकेदार म्हणुन तुमची राहील.

२९. अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावित कामगारांच्या उपस्थितीचे उपस्थिती पत्रक ठेवावे व कामगारांच्या उपस्थितीची खातरजमा ग्रा.पं.द्वारा दैनंदिन करण्यात येईल. सदरचे काम शासनाच्या विहित नियमानुसार निविदेतील अटी व शर्तीनुसार करण्यात यावे.

३०. सदर कामासंदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार झालेस आपणांस कोणतीही पुर्वसुचना न देता करारनामा रद्द करण्याचा अधिकार ग्रा.पं.कडे राखुन ठेवण्यात आला आहे.

ग्रामविकास अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत माण
ता.मुळशी, जि.पुणे.

प्रत :
मा.उपअभियंता (बांधकाम उपविभाग, ता.मुळशी) यांचेकडे सादर.
मा.उपअभियंता (ग्रा.पा.पु. उपविभाग, ता.मुळशी) यांचेकडे सादर.

Abhay Bio CNG Pvt. Ltd.

# सुधारीत कार्यारंभ आदेश

ग्रामपंचायत माण,
ता.मुळशी,जि.पुणे.
जा.क्र.T2-१९९/२२
दि.०३/०३/२०२२

34

प्रति,

**मे.अभय बायो सीएनजी प्रा.लि.,**
बी१,निलगिरी हाईट्स, १०३,बहिरटवाडी,सेनापती बापट रोड,जि.पुणे-१६.

**विषय :- मौजे माण येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प मौजे माण येथील गट नं.३००/१ येथील प्रकल्प पुन्हा नविन जागेवर तात्पुरत्या स्वरूपात कार्यान्वित करणेबाबत.**

**संदर्भ :- १. या कार्यालयाकडील कार्यारंभ आदेश जा.क्र.T2-१९/२०२१ दि.२५/०३/२०२१**
**२. ग्रा.पं.कडील काम थांबविण्याबाबतचे पत्र.**
**३. मे.अभय बायो सीएनजी प्रा.लि.यांचेकडील दि.१७/०२/२०२२ चे पत्र.**
**४. ग्रा.पं.माण मासिक सभा दि.२१/०२/२०२२ ठराव क्र.४१४/३**

वरील संदर्भ व विषयास अनुसरून आपणांस कळविणेत येते की, संदर्भ क्र.१ अन्वये मौजे माण येथील १५ टन ओला व सुका कचरा विलगीकरण करणे व त्याची विल्हेवाट लावणेबाबत आपणांस कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे व त्यानुसार तुम्ही **मा.उपअभियंता सो।, ग्रा.पा.पु.उपविभाग,ता.मुळशी** यांचे मार्गदर्शनाखाली **दिनांक-०१/०४/२०२१** पासुन काम सुरू केलेले आहे. परंतु मध्यंतरी माण येथील स्थानिक शेतक-यांनी सदरच्या प्रकल्पाकडे जाणा-या रस्त्यावर हक्क सांगुन रस्ता अडवुन कच-याच्या वाहतुकीस विरोध केलेला होता तेव्हापासुन सदरचे काम बंद ठेवण्यात आलेले आहे.

परंतु सद्या संदर्भ क्र.३ अन्वये तुम्ही तात्पुरत्या स्वरूपात सुसगाव येथील नविन ठिकाणी घनकचरा प्रकल्प कार्यान्वित करून सदरचे काम सुरू करण्यास परवाणगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्यानुसार संदर्भ क्र.४ अन्वये मासिक सभा दि.२१/०२/२०२२ ठराव क्र.४१४/३ अन्वये ठरलेनुसार मौजे माण अंतर्गत रॅम्प करून ग्रा.पं.कडील वाहनांद्वारे कचरा एकत्रित गोळा करून तो कचरा तुमचेकडील ट्रॅक्टर व टाटा-११०९ द्वारे ओला व सुका कचरा वाहुन तुम्ही सादर केलेल्या कंपनीच्या भाडेकरार व समजुतीच्या करारनाम्यानुसार सद्या तात्पुरत्या स्वरूपावर सुस येथील स.नं.४२/बी/४३/१/२ प्लॉट नं.२७,२८ वरील घनकचरा प्रकल्पावर शासन नियमानुसार व शासनाच्या सर्व प्रकारच्या परवाणग्या व अटी व नियमास अधिन राहुन व **मा.उपअभियंता सो।,** ग्रा.पा.पु.उपविभाग, ता.मुळशी यांचे तांत्रिक मार्गदर्शनाखाली दि.०४/०३/२०२२ पासुन घनकचरा प्रकल्प कार्यान्वित करून ग्रा.पं.माणने गोळा केलेल्या कच-यावर प्रक्रिया करणे व त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणेत यावी.

सदरचे काम करणेस **०६ महिन्यांची मुदतवाढ** देण्यात येत आहे. सदर ६ महिन्यांच्या कालावधी मध्ये नविन अंदाजपत्रक प्राप्त झालेस नविन अंदाजपत्रकानुसार कामाची निविदा प्रक्रिया करुन देणेत येईल व सदरचा करारनामा संपुष्टात येईल. तेव्हा सदरचे काम ग्रामस्थांच्या आरोग्याशी निगडित असल्याने यापुर्वीच्या अंदाजपत्रकानुसार करणेत यावे व प्राप्त मुल्यांकनानुसार देयके अदा करण्यात येतील. तेव्हा सदर काम करणेची **अंतिम मुदत दिनांक-०३/०९/२०२२** राहील.

तसेच सदर प्रकल्प कार्यान्वित करतांना यापुर्वी ग्रा.पं.माण व मे.अभय बायो सीएनजी प्रा.लि.यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्यातील सर्व अटी व शर्ती तुमचेवर बंधनकारक राहतील तसेच इतर महत्वाच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे :-

१. सदरचे काम ठेकेदाराने मंजुर अंदाजपत्रकीय दराने करणेस सहमती दर्शविलेली आहे त्यास अधिन राहुन सदर कामास विना दंड मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
२. ग्रा.पं.माणने दैनंदिन संकलित केलेला सर्व प्रकारचा ओला-सुका कचरा उचलण्याची जबाबदारी ठेकेदार म्हणुन तुमची राहील.
३. दैनंदिन संकलित झालेला कचरा तुमच्याकडुन वाहतुक करतांना किंवा वाहतुक करून ग्रामपंचायत माण हद्दीमध्ये कुठेही इतरत्र उघड्यावर ओला-सुका कचरा पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

४. माण अंतर्गत मोकळ्या जागेत ग्रामपंचायत माण मार्फ़त दैनंदिन संकलित होणा-या कच-याचे मोजमाप घेण्यासाठी वजनकाट्याची व्यवस्था करण्यात यावी.

५. दैनंदिन संकलित होणारा ओला-सुका कचरा मोजमाप करणेकामी मोजमाप (वजन) नोंदवही ठेवण्यात यावी त्यावर तुमचेकडील कर्मचारी व ग्रा.पं.माणने नेमुन दिलेल्या **श्री.शुभम राजु पारखी** या कर्मचा-याची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच ग्रा.पं.कडील घंटागाडी ड्रायव्हरची देखील त्या मोजमाप नोंदवहीवर स्वाक्षरी घेण्यात यावी.

६. घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया केंद्रावर माण अंतर्गत कच-यावर प्रक्रिया करून केलेल्या उपपदार्थांची किंवा खताची मोजमापासह स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात यावी व देयक सादर करतेवेळी सदर नोंदवही व मोजमापवही ग्रामपंचायतला सादर करण्यात यावी.

७. सदर दैनंदिन एकत्रित संकलित होणा-या कच-याचे व त्यावर प्रक्रिया करतांनाचे GEO टॅगसह फ़ोटो काढण्यात यावेत व सदरचे फ़ोटो देयक सादर करतांना ग्रामपंचायतला सादर करण्यात यावेत.

वरील प्रमाणे सर्व अटी व शर्ती तुमचेवर बंधनकारक राहतील. तसेच मौजे माण येथील घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया केंद्राच्या जागेचा व वाहतुकीच्या रस्त्याचा प्रश्न मार्गी लागल्यानंतर सदरचा प्रकल्प पुन्हा माण हद्दीमध्ये सुरू करण्याबाबत कळविण्यात येईल त्यानुसार पुढील आदेश होईपर्यंत घनकचरा प्रकल्प तात्पुरत्या स्वरूपावर नविन जागेवर कार्यान्वित करण्यात यावा व माण अंतर्गत दैनंदिन गोळा होणा-या कच-याची योग्य ती विल्हेवाट लावण्यात यावी.

प्रत 2/- मा.उपअभियंता (ग्रा.पा.पु. उपविभाग,ता.मुळशी)यांचेकडे सादर.

ग्रामविकास अधिकारी — सरपंच

ग्रामपंचायत माण

ता.मुळशी, जि.पुणे

236 (Annexure-H)

36

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
विभाग क्र.१, पुणे १.

स.नं.२२/२३, डॉ.आंबेडकर रोड,
मझदा बिल्डींग, पुणे 1.
दुरध्वनी क्र.(०२०) २९५२२१५६

जा.क्र.तांशा-३/मुळशी / तांत्रिक मंजुरी/ /२०२२ दिनांक : १५ /११ /२०२२

प्रति

अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,
पुणे ४११००१.

विषय :- ग्रामपंचायत माण तालुका मुळशी अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन करणे कामास तांत्रिक मान्यता प्रदान करणेबाबत

कामाचे नाव (१) २५ टन ओला व सुका कचरा विलगीकरण करणे व त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे रक्कम रुपये २,८०,५३,००० /-

(२) डंपिंग ग्राउंड वरील जुन्या घनकचऱ्याचे वर्गीकरण करणे बायोमायनिंग करणे व त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे रक्कम रुपये ३,४८,४६,७७८ /-

संदर्भ :- (१) उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग मुळशी यांचे पत्र क्रमांक ४०४ दिनांक ६/१०/२२

(२) ग्रामपंचायत माण, तालुका मुळशी, जिल्हा पुणे यांनी मासिक सभा क्रमांक ८ विषय क्रमांक २२ ठराव क्रमांक 678/3 दिनांक २३/०९/२२ दिलेली प्रशासकीय मान्यता

(३) ) ग्रामपंचायत माण, तालुका मुळशी, जिल्हा पुणे यांनी मासिक सभा क्रमांक ४ विषय क्रमांक १७ ठराव क्रमांक १२२ दिनांक २३/०९/२२ दिलेली प्रशासकीय मान्यता

(४) कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा बांधकाम विभाग पुणे जिल्हा परिषद पुणे यांचे पत्र क्रमांक जि प /३३८/ ग्रांच्या दिनांक ९/११/२२

(५) कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्रमांक एक पुणे यांचे पत्र क्रमांक ताशा एक ४१३६ दिनांक १०/१/२२ तांत्रिक मंजुरी मिळणे बाबत

वरील संदर्भ पत्र क्रमांक ४ नुसार वरील विषयांकित ग्रामपंचायत तिने घनकचरा व्यवस्थापन कामाचे अंदाजपत्रक प्राप्त झालेले आहे. संदर्भ पत्र क्रमांक ५ अन्वये तांत्रिक शुल्क भरण्याबाबत ग्रामपंचायतला कळविण्यात आले होते. त्यानुसार ग्रामपंचायतीने रुपये ६,२९,०००/- किमतीचे तांत्रिक शुल्क दिनांक 14 /११/२२ रोजी या कार्यालयाकडे भरणा केले आहे

सदर अंदाजपत्रकाची तांत्रिक मंजुरी आपल्या कार्यालयाच्या कार्यकक्षेत येत असल्याने अंदाजपत्रक आपल्या माहितीसाठी व पुढील मंजुरीच्या कार्यवाहीसाठी सादर करीत आहे.

सहपत्र : वरील प्रमाणे

(एन.एन.भाई)
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्र.१,
पुणे ४११००१

प्रत- ग्रामपंचायत माण, तालुका मुळशी, जिल्हा पुणे यांना माहितीसाठी .

ई-निविदाअंतर्गत खुलीनिविदा सुचना निविदासुचना क्र.१२ सन २०२२-२३

# ग्रामपंचायत माण, ता.मुळशी जि.पुणे

Annexure-I

ग्रामपंचायत माण, ता.मुळशी जि.पुणे यांचेतर्फे **महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ(एमपीसीबी), केंद्रीय प्रदुषण नियंत्रण महामंडळ(सीपीसीबी), बीएआरसी** यांचेकडे नोंदणीकृत असलेले योग्य त्या वर्गातील कंत्राटदार/ठेकेदार व कचरा व्यवस्थापन प्रकल्प करणा-या संस्था/ठेकेदार यांजकडुन दोन लिफ़ाफ़ा पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| निविदा सांकेतांक क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम रू. | निविदा फ़ी. रू. | इसारा रक्कम रू. | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ७ |
| GPMaan 12-2022-23-1 | मौजे माण येथील डंपिंग ग्राउंडवरील जुन्या घनकच-याचे वर्गीकरण करणे, बायोमायनिंग करणे व त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे. | ३,४८,४६,७७८/- | १००००/- | निविदा रक्कमेच्या १ % | १२ महिने |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे**

१. सदर संपुर्ण निविदा प्रक्रीया ई-निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदे संदर्भातील निविदा नोटीस प्रसिध्दी, सुचना, शुद्धीपत्रके इत्यादीची माहीती **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. वरील कामाचे निविदा प्रपत्रे **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. सदर निविदा प्रपत्रे, अटी, शर्ती, इ. सदर संकेतस्थळावर दि.१२/१२/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजेपासुन ते दि.०१/०१/२०२३ चे दुपारी.०३.०० वाजेपर्यंत अधिगृहीत (Download) करता येतील.

३. वरील कामाच्या निविदा **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर संकेतस्थळावर दि.१२/१२/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजेपासुन ते दि.०१/०१/२०२३ चे दुपारी. ०३.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पद्धतीने सादर करता येतील.

**४. लघुत्तम निविदाधारकाने कामगारांचा व कारागिरांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविले बाबतची प्रत कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. त्याशिवाय कार्यारंभ आदेश दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

**अ) निविदा भरण्याची कार्यपद्धती–अ)तांत्रिक लिफ़ाफ़ा - कागदपत्रांच्या मुळ प्रती स्कॅन करून अपलोड कराव्यात**

१. प्रत्येक कामाचे निविदा प्रपत्र डाऊनलोड केल्याची निविदा फ़ी, व बयाणा/इसारा रक्कम निविदा सुचना रकाना क्रमांक ४ व ५ नुसारच्या रक्कमेनुसार ग्रामपंचायतच्या खातेवरती **ऑनलाईन पद्धतीने** भरणे आवश्यक आहे.

२. कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र (फ़ोटोसहीत) किंवा ग्रा.पं.ना-हरकत दाखला, शॉप अक्ट लायसन्स व प्राप्तीकर पॅनकार्ड स्कॅन करून pdf. मध्ये सुस्पष्ट अपलोड करावे लागेल.

३. निविदाकार किंवा त्याच्या सहयोगी कंपनी कडे एमपीसीबी, सीपीसीबी, बीएआरसी पैकी एकाची तरी नोंदणीकृत मान्यता असणे गरजेचे आहे . जसे की बीएआरसीचे मान्यता असलेली निसर्गरुना टेक्नॉलॉजी (बायोगॅससाठी).

४. निविदाकाराची कंपनी कमीतकमी ३वर्ष जुनी आणि कंपनीला किमान घनकचरा व्यवस्थापनाचा ३वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

५. विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र (Declaration of Contractor) व विमा करारनामा (Insurance Agreement Copy) सही शिक्क्यानिशी स्कॅन करून pdf. मध्ये अपलोड करावे लागेल.

६. मागील ३ वर्षाचे आयकर भरल्याचे प्रमाणपत्र व GST प्रमाणपत्राची प्रत किंवा जीएसटी नोंदणी प्रमाणपत्रासाठी अर्ज केले बाबतची पोहोच स्कॅन करून अपलोड करणे बंधनकारक राहील.

७. निविदाकार पीएफ़, ESICनोंदणीकृत असावा व चालु आर्थिक वर्षात सर्व कर्मचारी यांचा पीएफ़ वेळेवर संबंधितांच्या खातेवर जमा केलेबाबतची प्रत यादीसह सोबत जोडण्यात यावी.

८. निविदेमध्ये सादर केलेली कागदपत्रे खरी असल्याबाबतचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-१) रू.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर लिफ़ाफ़ा क्र.१ मध्ये सादर करणे बंधनकारक राहील.

९. भागीदारी संस्था असल्यास भागीदारी करारनामा तसेच आवश्यकतेनुसार पॉवर ऑफ़ अटर्नी जोडावी.

१०. मजिप व पं.स.लेखासंहिता १९६८ मधील प्रचलित नियमानुसार कामांस मुदतवाढ देणे, नुकसान भरपाई अथवा दंड आकारणी लावणे व प्रसंगी काम काढुन घेणे याबाबतचे सर्व अधिकार ग्रामपंचायतीकडे असतील.

११. निविदाकाराने महानगरपालिका, नगरपरिषद यांच्याकडे कमीतकमी १ तरी (अंदाजे १५ टन) ओला व सुक्या कचऱ्याच्या व्यवस्थापनाचे काम शास्त्रोक्त पद्धतीने यशस्वी रित्या केलेले किंवा चालू असावे. तसेच किमान २ बायोगॅस प्लांट प्रत्येकी ५ टन असे किमान २ वर्ष यशस्वी रित्या चलावलेले किंवा आताही चालू असावेत. आवश्यक असल्यास माण ग्रामपंचायत निविदाकाराने नमूद केलेल्या कोणत्याही पूर्ण झालेल्या प्रकल्पांना भेट देऊ शकेल कामाचा अनुभव असल्यास त्यासंबंधित आवश्यक दाखले सोबत जोडावेत. कामांचा अनुभव विचारात घेऊन त्याप्रमाणे काम देणेस प्राधान्य देण्यात येईल.

१२. सदर कामासाठी बायोमायनिंगच्या १कामाचा तरी अनुभव असावा सोबत तसे अनुभवाचा दाखला जोडण्यात यावा.

१३. सदर ठिकाणची निविदा धारकाने समक्ष हजर राहुन पाहण्यात यावीत. ग्रा.पं.चा स्थळपाहणी दाखला सोबत जोडणे आवश्यक आहे.

(38)

१४. निविदाकाराकडे Scientifi Landfill साठी माण ग्रामपंचायतीच्याच हद्दीत 5000चौ.फुट जागा असणे आवश्यक आहे .तसेच त्याबाबत जमीन व शेड मालकाकडून घनकचरा व्यवस्थापनासाठी ३ वर्षाची एनओसी घेणे आणि जागेचा ७/१२ उतारा निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे अथवा भाडेतत्वावर ५००० स्क्वे.फुट जागा भाडेकरार /लिज करुण रजिस्टर करारनामा सोबत जोडणे आवश्यक आहे.

१५. सदर कामगारांचा सुरक्षिततेच्या दृष्टीने विमा/भविष्य निर्वाह निधी काढणे ठेकेदार यांचेवर बंधनकारक राहील. सदर कामगारांना सुरक्षाविषयक नियम व अटींचे पालन करणे व सुरक्षाविषयक सर्व साधने पुरविणे ठेकेदार यांचेवर बंधनकारक राहील तसे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

१६. निविदाकार आज रोजी कमीत कमी २०टन ते ४०टन कचऱ्यावर (ओला-सुका मिळून ) प्रक्रिया करत असावा तसे प्रमाणपत्र सोबत सादर करावे.

उपरोक्त मधील कोणतेही एक कागदपत्रे अपलोड केलेले नसल्यास व अपुर्ण / अवैध असल्यास सदर ठेकेदाराची निविदा बाद करण्यात येईल व त्याचा व्यापारी लिफ़ाफ़ा उघडण्यात येणार नाही. तसेच कोणतीही कागदपत्रे अपलोड करण्यास वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

ब) **व्यापारी लिफ़ाफ़ा –**

१. ई-निविदेसोबत जोडलेल्या BOQ File मध्ये निविदा धारकाचे नांव व दर नमुद करावा.

२. **निविदा धारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा अधिक दराने कमी असेल तर एवढ्या कमी दरात कामाचा दर्जा योग्य राखुन काम कसे पुर्ण याबाबतचा सविस्तर लेखी तपशील स्वाक्षरीसह लिफ़ाफ़ा क्र.२ मध्ये विहीत ठिकाणी स्कॅन करून सादर करावा अन्यथा निविदा अवैध समजण्यात येईल.**

३. **निविदा धारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दरांचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किंमतीच्या १% एवढ्या किमतीची बँकेची प्रतीपुर्ती हमी परफ़ॉर्मन्स सिक्युरिटी म्हणुन निविदेच्या लिफ़ाफ़ा क्र.२ मध्ये सादर करावी.(तसेच Scan करून ई-निविदेसोबत सादर करावी.) बँक प्रतिभुती हमी सरपंच, "ग्रामपंचायत माण" च्या नावे असावी. (उदा.१% ते १०% कमी दर - १% रक्कम)**

४. **निविदा धारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढ्या जास्त दराने आहे तेवढ्या रकमेचा व वरील बाब-४ प्रमाणे बँकेची प्रतिपूर्ती हमी निविदेसोबत लिफ़ाफ़ा क्र.२ मध्ये सादर करावी.**(उदा.१४.००% कमी दर :- १०% पर्यंत करिता १% व (१४% - १०%) ४% असे एकूण ५%) ही रक्कम रूपये १०००/- पेक्षा कमी असल्यास किमान रूपये १०००/- ची बँकेची प्रतिपूर्ती हमी सादर करणे अनिवार्य राहील नसलेस निविदा अवैध ठरविणेत येईल.

५. **बँक प्रतिभुती हमी सरकारी/शेड्युल्ड तसेच सार्वजनिक क्षेत्रातील बँकेची असावी. बँक प्रतिभूती हमीची मुदत कामाच्या दोषदायित्व कालावधीनंतर एक महिना कालावधीपर्यंत असावी.**

६. कंत्राटदाराने अंदाजपत्रकीय दराच्या १०% पेक्षा कमी दर भरल्यास अतिरिक्त इसारा रक्कम / कामगिरी सुरक्षा ठेव रक्कमेची बँक प्रतिभुती हमी सादर केल्यास अथवा आवश्यक बँक प्रतिभुती हमी सादरच न केल्यास सदर कंत्राटदाराची निविदा रद्द करण्यात येईल.

७. निविदा प्रपत्रातील सविस्तर निविदा नोटीस मधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारांवर बंधनकारक राहतील. ऑनलाईन पद्धतीने सादर केलेला लिफ़ाफ़ा क्र.१ (तांत्रिक लिफ़ाफ़ा) **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर शक्यतो दि.०२/०१/२०२३ रोजी दुपारी.०३.०० वाजता ग्रामपंचायत माण कार्यालयात उघडणेत येईल.

८. पात्र निविदा धारकांचा दराचा लिफ़ाफ़ा क्रमांक २ उघडणेचा दिनांक व वेळ संबंधित ठेकेदारांस e-mail द्वारे कळविण्यात येईल.

९. मंजुर निविदा धारकाकडुन विहित सुरक्षा अनामत रक्कम ही कामाचा करारनामा करतेवेळी ग्रामपंचायत माण, ता.मुळशी, यांचे नावे असलेल्या ठेव पावती स्वरूपात/ चलनाने रोख स्वरूपात घेतली जाईल व उर्वरीत अनामत रक्कम देयकातुन कपात केली जाईल.

१०. सेवाकर भरणे कंत्राटदाराची जबाबदारी राहील व तो भरणे बंधनकारक राहील.

११. निविदेबाबत कोणत्याही मार्गदर्शक सुचना,शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती**http://mahatenders.gov.in**या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

१२. कामासंबंधीचे सविस्तर आराखडे/नकाशे इत्यादी कार्यालयीन वेळेत निविदा कालावधीमध्ये निम्न स्वाक्षरीस्तांचे कार्यालयात विनामुल्य पहावयास मिळतील.

१३. निविदा धारकाने १०% पेक्षा जास्त कमी दराची निविदा भरल्यास त्याबाबतचे समर्थन व अतिरिक्त १० सुरक्षा अनामतीचा धनाकर्ष करारनामा सादर करतेवेळी सादर करावा लागेल.

१४. कोणतेही कारण न देता निविदा अथवा सर्वच निविदा नाकारणेचा किंवा रद्द करणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखुन ठेवला असुन निविदा भरणा-या ठेकेदाराला निविदा फ़ेटाळल्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

१५. निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यांवर कागदपत्राच्या विधीग्राह्यतेबाबत आक्षेप नोंदविला गेल्यास सदरची बाब कायदेशीर / फ़ौजदारी कार्यवाहीस पात्र राहील.

१६. निविदा प्रक्रिया संपुर्ण संगणकीकृत असलेने ई-प्रणाली द्वारे निविदा उघडलेचा मेसेज ऑनलाईन येतो, तो पाहण्याची जबाबदारी निविदाधारकाची असुन त्याबाबत स्वतंत्र कोणताही पत्रव्यवहार अथवा भ्रमणध्वनीद्वारे कळविले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ग्रामविकास अधिकारी सरपंच

ग्रामपंचायत माण

ता.मुळशी, जि.पुणे

## कार्यारंभ आदेश



## ग्रामपंचायत माण, ता.मुळशी, जि.पुणे

'Annexure-I' (39)

करारनामा क्रमांक बी.१/ /सन २०२२-२३

ग्रामपंचायत माण,
ता.मुळशी, जि.पुणे
जा.क्र.T2-०१ /२३
दि.०४/०१/२०२३

ग्रामपंचायत माण, स्थापना-१९५६ * ता.मुळशी, जि.पुणे *

प्रति,

मे.अभय बायो सीएनजी प्रा.लि.पुणे,

१०३, बहिरटवाडी, सेनापती बापट रोड, जि.पुणे-१६.

**कामाचे नाव** :- **मौजे माण येथील डंपिंग ग्राउंडवरील जुन्या घनकच-याचे वर्गीकरण करणे, बायोमायनिंग करणे व त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे.**

**संदर्भ** :- **ई-निबिदा अंतर्गत बी.१ निविदा नोटीस क्र-१२/ २०२२-२३.**

**अंदाजपत्रकीय रक्कम:- ३,४८,४६,७७८/-(रू.तीन कोटी अठ्ठेचाळीस लाख शेचाळीस हजार सातशे अठ्ठ्याहत्तर फ़क्त)**

वरील संदर्भिय पत्राप्रमाणे जाहीर निविदानुसार करारनाम्याची पूर्तता करून दिलेली असुन या आदेशान्वये आपणांस कळविण्यात येते की, सदरचे काम आपण निविदेतील अटी व शर्तीस अधिन राहुन ग्रामपंचायत माण यांचे सुचनेप्रमाणे व मा.उपअभियंता सो,ग्रा.पा.पु.उपविभाग,ता.मुळशी यांचे मार्गदर्शनाखाली **दिनांक-०५/०१/२०२३** पासुन सुरू करावे. सदरचे काम **निविदा दराने** मंजुर केलेले असुन त्यानुसार कामाची एकुण **किंमत–३,४८,४६,७७८/-(रू.तीन कोटी अठ्ठेचाळीस लाख शेचाळीस हजार सातशे अठ्ठ्याहत्तर फ़क्त)** सद्या जीएसटी नियमानुसार सदर कामास जीएसटीची रक्कम देय नाही त्यामुळे सदर कामाबाबत पुढील आदेश येईपर्यंत जीएसटीची रक्कम अदा करण्यात येणार नाही.

सदरच्या काम करणेचा **कालावधी ३६५ दिवस** आहे. त्यानुसार काम करण्याची अंतिम तारीख **दि.०४/०१/२०२४** आहे. करारनाम्यामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार काम करणे आपणावर बंधनकारक राहील. संबंधित कामाबाबत ग्रामपंचायत माण यांचेकडून आपणास वेळोवेळी मिळणा-या सुचना आपणांवर बंधनकारक राहतील.

**<u>अटी व शर्ती खालीलप्रमाणे</u> –**

१. ग्रामपंचायत माण कार्यक्षेत्रातील डंपिंग ग्राउंडवरील घनकचऱ्याचे ग्रा.पं.ने ठरवुन दिलेल्या निकषानुसार ओला व सुका कचरा याचे प्लास्टिक, रबर कापड,चप्पल-बूट, धातू इ. प्रकारात विलगीकरण करणे व पुनर्चक्रण याकरिता पाठविण्याचे प्रतिमहा भाडे देणे व त्या अनुषंगाने येणारी इतर कामे करणे. सदर कामाकरिता ग्रा.पं.कडुन कोणत्याही प्रकारची जागा उपलब्ध करून देणार नाही.

२. ग्रामपंचायत माणच्या कार्यक्षेत्रामधील डंपिंग ग्राउंडवरील ओला कचरा शात्रोक्त पद्धतीने (विन्ड्रो कम्पोस्टिंग पद्धतीने) जिरवून त्याचे विहित मानांकनाप्रमाणे खत तयार करणे व त्या अनुषंगाने येणारी इतर कामे करणे, तसेच खताच्या विक्रीची पूर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील.

३. कामाच्या वेळेत डंपिंग ग्राउंडवरील व बायमायनिंग करावयाच्या ठिकाणी नियुक्त कर्मचाऱ्यांनी धूम्रपान व मद्यपान केल्यास संबंधित ठेकेदारांवर व सदर कर्मचाऱ्यावर ग्रामपंचायत कडून कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

४. डंपिंग ग्राउंडवर बायोमायनिंग करणेकरीता व घनकचरा व्यवस्थापनासाठी साठवणुकी करीता आवश्यक जागा, आवश्यक मशिनरी, शेड, प्लॅटफोर्म ठेकेदाराने उपलब्ध करून देणे.

५. डंपिंग ग्राउंडवर व बायोमायनिंग करणा-या कामगारांना लागणारे मास्क, रेनकोट, गमबुट व हातमोजे आवश्यकतेनुसार ठेकेदाराने पुरवायचे आहेत ते न पुरविल्यास ग्रामपंचायत पुरवील व त्याची रक्कम ठेकेदाराच्या बिलातून वसूल करण्यात येईल.

६. काम करताना मजूर अथवा साधनांपासून कुठल्याही नागरीकाला त्रास होता कामा नये व पर्यावरण बिघडेल अशी कोणतीही कृती करता कामा नये.

७. निविदाकाराचे काम असमाधानकारक असल्यास एक महिन्याची पुर्वसूचना देऊन निविदा रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेला आहे सदर ठेका पद्धतीचा कालावधी १२ महिने आहे. काम समाधानकारक वाटल्यास अतिरिक्त मुदतवाढ देणेबाबत वरिष्ठ कार्यालयाच्या मार्गदर्शनानुसार मुदतवाढ देण्यात येईल.

८. काही कारणास्तव ठेकेदारास संस्थेला काम करण्याची इच्छा नसल्यास ठेकेदाराने किमान एक महिने अगोदर ग्रामपंचायत माणला कळविणे बंधनकारक राहील व त्यामुळे होणारे नुकसान भरपाई ठेकेदार यांचेवर बंधनकारक राहील.

९. प्रकल्पाच्या ठिकाणी ठेकेदाराच्या कामगारांमध्ये काही वाद उद्भवल्यास त्याची सर्व जबाबदारी ठेकेदारावर राहील.

ग्रामविकास अधिकारी          सरपंच
ग्रामपंचायत माण
ता.मुळशी. जि.पुणे.

(40)

१०. मा.सरपंच, ग्रामविकास अधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या संबंधित अधिकारी यांच्या सूचनांचे पालन करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

११. दंगल संप किंवा आपत्कालीन परिस्थितीमध्ये सुद्धा ठेकेदाराच्या कामाची प्रक्रिया चालू राहील परंतु अशा कालावधीमध्ये जबाबदारी पार पाडताना नुकसान झाल्यास झालेल्या नुकसानाची भरपाई मागण्याचा हक्क ठेकेदारास राहील.

१२. करारनाम्यातील कोणत्याही अटी व शर्तीचा ठेकेदाराने भंग केल्यास निवेदेतील बयाणा रक्कम/अनामत रक्कम जप्त करून पूर्व नोटीस देऊन निविदा रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायत माण यांच्याकडे राहील .

१३. कंत्राटदाराने त्याच्याकडे सर्व कामगारांना सामूहिक कामगार विमा उतरविणे ठेकेदारावर बंधनकारक राहील, ठेकेदाराने आपल्या कामगार वर्गाचे ओळखपत्र फोटोग्राफ सहित तयार करून घेणे जरुरीचे आहे.

१४. निविदेसंदर्भात काही वाद झाल्यास ग्रामपंचायत माण मासिक सभेचा निर्णय अंतिम राहील.

१५. कोणत्याही ऑर्डरवर अधिकाऱ्याची सही नसल्यास अगर तोंडी ऑर्डर दिल्यास ठेकेदार यांनी काम करावयाचे नाही आणि जर ठेकेदाराने याप्रमाणे काम करून दिले व त्यामध्ये गफलत झाली तर सदर कामाची रक्कम ठेकेदार यास ग्रामपंचायतीकडून मागता येणार नाही.वर नमूद केलेल्या तरतुदीप्रमाणे ऑर्डर मिळाल्यानंतर या मुदतीत ग्रामपंचायतीला काम करून देण्याबाबत ऑर्डर दिली असेल त्या मुदतीत ठेकेदार यांनी जितक्या कामासाठी ऑर्डर दिली असेल तितके काम घेऊन कार्यालयाचे दिवशी व वेळी ग्रामपंचायतेतील कार्यालयात अगर ऑर्डर मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी हजर राहावे. ठेकेदाराने केलेले काम बरोबर आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी त्याचप्रमाणे दिलेल्या कामाची खात्री करून ते ताब्यात घेण्यासाठी ग्रामपंचायतीने सांगितलेल्या इसमास काम दाखवून त्या कामाची खात्री करून द्यावी.

१६. निविदेमधील व जि.प.च्या तांत्रिक मान्यता आदेशातील अटी व शर्ती व त्यास अनुसरून सदर प्रकल्पाबाबत ग्रामपंचायत व ठेकेदार यांच्यामध्ये झालेला पत्रव्यवहार हा या करारनाम्याचा अविभाज्य घटक राहील.

१७. सदरचे काम मंजुर निविदा कालावधीमध्ये दररोज करणे बंधनकारक राहील. सदरचे बायोमायनिंगचे काम सार्वजनिक तसेच इतर सुट्यांचे दिवशी ठेकेदारास काम बंद ठेवता येणार नाही.काही अपरिहार्य कारणास्तव कचरा प्रक्रिया बंद ठेवायचा असल्यास ग्रा.पं.कार्यालयास अगोदर लेखी स्वरूपात पुर्व कल्पना देणे बंधनकारक राहील व त्यादिवशी पर्यायी व्यवस्था करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१८. तुम्ही नेमलेले मजुर/कर्मचा-यांना लागणारी सुरक्षा विषयक साधने उदा.हॅण्ड ग्लोव्हज,युनिफॉर्म ई, ठेकेदार खर्चाने पुरविणार आहेत. तसेच कामावर असणा-या आमचे मजुर कर्मचारी यांस कोणत्याही प्रकारची इजा,दुखापत,अपघात झाल्यास त्यास ठेकेदार जबाबदार आहे त्याचा सर्व वैध्यकीय खर्च करणेची जबाबदारी ठेकेदार यांची राहील. याबाबत ग्रा.पं.ला जबाबदार धरले जाणार नाही व कोणताही मोबदला ग्रा.पं.देणार नाही याची आम्हा(ठेकेदार) यांना स्पष्ट कल्पना दिली आहे व ती आम्हाला मान्य आहे.

१९. किमान वेतन कायदा १९४८, व वेतन प्रदान १९३६ बालकामगार (प्रतिबंध व निर्मुलन अधिनियम १९८६ व अन्य कामगार कायद्याचे कुठल्याही प्रकाराचे उल्लंघन होणार नाही त्या कायद्यांचे पालन करण्याची जबाबदारी ही कंत्राटदार यांची राहील.त्यासंदर्भातील कामगारांचा वीमा काढणेची जबाबदारी ठेकेदार यांचीच राहील.कामगार कायदा १९६०नुसार कामगारांना आठवडा सुट्टी देणे व आठवडा सुट्टीचे दिवशी पर्यायी मजुर उपलब्ध करून देणेची जबाबदारी ही ठेकेदारावर राहील.

२०. डंपिंग ग्राउंडवरील असलेला ओला-सुका कचरा महाराष्ट्र शासन प्रदुषण मंडळाच्या नियमानुसार वर्गीकरण करून बायोमायनिंग करणे बंधनकारक राहील.

२१. सदर कामाच्या स्थिती/दर्जानुसार उपविभागामार्फत कामाचे मुल्यांकन करण्यात येईल प्राप्त मुल्यांकनानुसार शासन नियमानुसार कपाती करून देयक अदा करण्यात येईल.

२२. घनकचरा बायोमायनिंग प्रकल्पाकरिता पुरविण्यात येणा-या सर्व मशिनरी व साहित्याचा व कामगारांचा विमा उतरविण्याची जबाबदारी ठेकेदार म्हणुन तुमची राहील.

२३. अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावित कामगारांच्या उपस्थितीचे उपस्थिती पत्रक ठेवावे व कामगारांच्या उपस्थितीची खातरजमा ग्रा.पं.द्वारा दैनंदिन करण्यात येईल. सदरचे काम शासनाच्या विहित नियमानुसार निविदेतील अटी व शर्तीनुसार करण्यात यावे.

२४. सदर कामासंदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार झालेस आपणांस कोणतीही पुर्वसुचना न देता करारनामा रद्द करण्याचा अधिकार ग्रा.पं.कडे राखुन ठेवण्यात आला आहे.

Abhay Bio CNG Pvt. Ltd.

A.Adhav

ग्रामविकास अधिकारी     सरपंच

ग्रामपंचायत माण

ता.मुळशी, जि.पुणे.

ग्रामपंचायत माण, स्थापना-१९५६, ता.मुळशी, जि.पुणे

प्रत :

मा.उपअभियंता (बांधकाम उपविभाग, ता.मुळशी) यांचेकडे सादर.

मा.उपअभियंता (ग्रा.पा.पु. उपविभाग, ता.मुळशी) यांचेकडे सादर.